# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य / State: महाराष्ट्र  जिल्हा / District: मुंबई  पोलीस ठाणे / Police Station: ACB  पहिली खबर क्र. / FIR No.: 32  वर्ष / Year: 2026  दिनांक / Date: 22.10.26

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम  कलमे Sections: 13(1)(ब), 13(2)
   (ii) अधिनियम Act: 1988  कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: —

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ............ तारीख पासून Date from 05.01.05 वेळ Time — तारीख पर्यंत Date to 04.11.22 वेळ Time —

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची / Information received at P. S. तारीख Date 22.10.2026 वेळ Time —

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No. 12 तारीख Date 22.10.26 वेळ Time 11:05

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: आलोसे यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे ठिकाण.  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. / Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name — ठिकाणाचे नंबर / No. if any — गल्ली / Ward — रस्त्याचे नाव / Name of road —

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable place — गाव / Village — पोस्ट / Post — तालुका / Taluka — जिल्हा / Dist. — राज्य / State —

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव / In case, outside the limit of this Police Station — तालुका / Taluka — जिल्हा / Dist. — राज्य / State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव / Name: दिनेश विलास भदाणे  (b) वडिलांचे / पतीचे नाव / Father's / Husband's Name: विलास भदाणे
(c) जन्म तारीख व वय / Date of Birth and Age: 41 वर्षे  (d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय  फोन नं. / Phone No.: 9423980767
(e) पारपत्र क्रमांक / Passport No. —  दिल्याचा दिनांक / Date of issue —  दिल्याचे ठिकाण / Place of Issue —  (f) व्यवसाय / Occupation —
(g) धर्म Religion: हिंदू  जात Caste —  जनजात Sub-Caste —
(h) पत्ता / Address: C-11  गल्ली/सर्व्हे नं. / Ward —  घर/नाव नं. / House Name No.: निशांत कोर्ट  फोन/मो. नं. / Phone No. ....  पॅन नं. / Pan No. ....  वोटर्स नं. / Card No. ....

रस्त्याचे नाव / Road: धात्रक फाटा  जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place: K.K. Agri college  गाव / Village ....  पोस्ट / Post ....  पो. स्टे. / P. Stn. ....

तालुका / Taluka: नाशिक  जिल्हा / Dist.: नाशिक  राज्य / State: महाराष्ट्र  सध्याचा पत्ता / Present Address: ACB Mumbai Unit

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

सतिश विठ्ठलराव पोवार वय 57 वर्षे, कार्यकारी अभियंता / सहाय्यक अभियंता, के/पूर्व विभाग यांचे कार्यालय, म.न.पा. मुंबई, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई
घरपत्ता :- बिल्डिंग नं. 04, रूम नं. 08, 3 रा मजला, नवजीवन कॉलनी, मोरी रोड माहिम, मुंबई - 400016

(G.C.P.) K 1043 (A) (1000-1-2025)

Scanned with OKEN Scanner

# फिर्यादी

दि. 22.10.2026

फिर्यादी दिनेश विलास भदाणे. वय- 41 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पोलीस निरीक्षक. ला.प्र.वि. मुंबई घटक. रा. निशांत कॉलनी C-11, धात्रकफाटा, K.K. ॲग्रीकल्चर कॉलेजच्या पाठीमागे नाशिक. मो.नं- 9423980763 यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून जोडण्यात येत आहे.

समक्ष

ता. 22.10.26
ACP. Sandeep Gaikwad
ACB. Mumbai Unit

दिनेश भदाणे
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि., मुंबई

फिर्याद दि. २२/१०/२०२६

श्री.दिनेश विलास भदाणे,वय ४१ वर्षे, धंदा–नोकरी (पोलीस निरीक्षक), रा.ठी. सी–११, निशांत ब्लेझ, धात्रकफाटा, के.के. वाघ ॲग्रीक्लचर कॉलेजच्या पाठीमागे, नाशिक ता.जि. नाशिक पिन – ४२२००३ मो.नं:– ९४२३९८०७६३.

---

मी वरिलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर कुटूंबीयासह राहावयास आहे. मी दि. १६/०६/२०२६ रोजी पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक (एटप) या पदावर कार्यरत आहे.

सतिश विश्वनाथ पोवार, पदनिर्देशित अधिकारी (कार्यकरी अभियंता), सहा. आयुक्त, के/पुर्व विभाग यांचे कार्यालय, बृहन्मुबई महानगरपालिका, गुंदवली, अंधेरी (पु.), मुंबई. रा.ठि – बिल्डींग नं. ४, फ्लॅट क्र. ८, तिसरा मजला, नवजीवन कॉलनी, मोरी रोड, माहिम, मुंबई – ४०० ०१६ यांचे विरुध्द लाप्रवि, मुंबई येथे गु.र. क्र. ४१/२०२२, दि. ०५/११/२०२२ भ्र.प्र. अधि. १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने नमुद आलोसे सतिश विश्वनाथ पोवार यांच्या वरील रहाते घरी पोलीस निरीक्षक श्री. हणमंत क्षिरसागर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी घरझडती घेतली होती. सदर घरझडती मध्ये रोख रक्कम रुपये १,१३,००,०००/–, सोन्याचे १२८७.२०० ग्रॅम वजनाचे दागिने, फर्निचर व इतर वस्तु असे एकुण मालमत्ता कि. रु. १,६६,०४,९५०/– मिळून आली. त्यानुसार वरिष्ठांनी नमुद आरोपी लोकसेवक यांच्याकडे मिळून आलेल्या मालमत्ते संदर्भात जा.क्र.१००८१/लाप्रवि/बृमुंवि/वा–१/उ.चै.३१/२२ दि.२२/११/२०२२ अन्वये उघड चौकशी करण्याबाबत आदेशीत केले होते. नमुद उघड चौकशीत सपोआ चंद्रकात माळी यांनी दिनांक २१/०५/२०२६ रोजी चौकशीचा अंतिम अहवाल सादर केलेला आहे. सपोआ चंद्रकांत माळी यांची लाप्रवि लातूर येथे बदली झाल्याने त्यांचे कडील गुन्हा, उघड चौकशी व इतर कागदपत्रे हे तपासकामी व चौकशी कामी आम्हास वर्ग झाले आहेत.

नमुद अंतिम अहवालाचे अवलोकन केले असता गैरअर्जदार यांचा परिक्षण कालावधी ०५/०१/२००५ ते दि. ०४/११/२०२२ रोजी असा आहे. गैरअर्जदार, व त्यांचे कुटूंबिय व संबंधित साक्षीदार यांच्याकडे चौकशी करून त्यांचे सविस्तर जबाब नोंद केले आहेत. त्याचप्रमाणे संबंधीत कार्यालये, बॅंक, विविध शासकिय, निमशासकिय, खाजगी संस्था, बॅकांकडे कडुन उघड चौकशीच्या अनुषंगाने माहीती प्राप्त केली खालीलप्रमाणे.

<u>गैअ यांचे कौटुंबिक माहिती खालीलप्रमाणे –</u>

गैअ यांचे मुळ गांव कोल्हापुर शहरातील पापाची तिकडी हे असुन त्यांचे वडिल १९९४ साली निधन पावले असून त्यांचे आईचे दि. २६/०७/२०१९ रोजी निधन झाले आहे. दि. १८/१२/१९९४ रोजी सौ. कविता सतिश पोवार (माहेरचे नाव कविता मनोहर माने) यांचेशी लग्न झाले आहे. सौ. कविता सतिश पोवार या गृहिणी आहेत. गै.अ. सतिश पोवार व सौ. कविता सतिश पोवार यांना दोन मुले असून त्यांची नावे हिमांशू व ओम अशी आहेत. कु. हिमांशू हा सिव्हील इंजिनिअर असून तो सद्या टाटा कन्सल्टींग इंजिनिअर येथे कामास आहे. कु. ओम याचे यावर्षी बी.टेक. पुर्ण झाले असून तो सुगी बिल्डर्स यांचेकडे नोकरीस आहे.

गै.अ. यांचे मोठे भाऊ श्री. सुधाकर विश्वनाथ पोवार हे घटस्फोटीत होते. त्यांचे दि. ०५/१०/२०११ रोजी निधन झाले आहे. त्यांची बहीण श्रीमती हेमलता बाळकृष्ण हंकारे हया पेशाने डॉक्टर (स्त्रीरोगतज्ञ) असुन त्या ठाणे येथील मनोरुग्ण रुग्णालयातून वैद्यकीय अधिकारी म्हणून सुमारे १० वर्षापुर्वी सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांचे दुसरे भाऊ श्री. शरद विश्वनाथ पोवार हे बदलापूर येथे राहत असून ते विवाहीत आहेत. ते बदलापूर येथे खाजगी कंपनीत सध्या कामाला आहेत.



Scanned with OKEN Scanner

**गैअ यांचे नोकरीचा तपशिल –**

गैअ यांची जानेवारी–२००५ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर एच/पश्चिम विभाग, बांद्रा (पु.), बृहन्मुबई येथे नेमणूक झाली आहे. गैअ यांनी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या खालील नमुद विभागामध्ये काम केले आहे.

| अ.क्र. | पदनाम | सेवा कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| ०१ | कनिष्ठ अभियंता | जानेवारी २००५ ते सप्टेंबर २००६ | एच/पश्चिम विभाग, बृहन्मुबई मनपा, इमारत व कारखाने विभाग, हिल रोड, बांद्रा (पु.), मुंबई – ४०० ०५२. |
| ०२ | दुय्यम अभियंता (पदोन्नती) | ऑक्टो. २००६ ते एप्रिल २०१० | एच/पश्चिम विभाग, बृहन्मुबई मनपा, इमारत व कारखाने विभाग बांद्रा (पु.), मुंबई – ४०० ०५२. |
| ०३ | दुय्यम अभियंता | मे २०१० ते सप्टे. २०१७ | के/पुर्व विभाग, प्रकल्प अधिकारी, झोपडपट्टी निर्मुलन विभाग, तेली गल्ली, अंधेरी (पु.), मुंबई – ४०० ०६८. |
| ०४ | सहा. अभियंता (पदोन्नती) | ऑक्टो. २०१७ ते एप्रिल २०२० | जी/दक्षिण विभाग, बृहन्मुबई मनपा, इमारत व कारखाने विभाग, धनमिल नाका, भाऊ दाजी रोड, मुंबई – ४०० ०३०. |
| ०५ | कार्यकारी अभियंता (पदोन्नती) | मे २०२० ते ०४/११/२०२२ | के/पुर्व विभाग, प्रकल्प अधिकारी, इमारत व कारखाने विभाग, तेली गल्ली, अंधेरी (पु.), मुंबई – ४०० ०६८. |

गैरअर्जदार यांचे उघड चौकशामध्ये केलेल्या सविस्तर चौकशीत एकुण उत्पन्न, एकण खर्च बाबत सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

**आरोपी लोकसेवक श्री.सतीश पोवार यांची उत्पन्न, खर्च व मालमत्ता बाबत सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे.**

**१) गैअ यांच्या उत्पनाची माहिती – रूपये २,०५,०६,८८७/–**

| अ.क्र. | उत्पन्नाचा तपशील | उत्पन्न रुपये |
|---|---|---|
| १ | निव्वळ वेतन | १,०३,३९,२०२ |
| २ | बिल्डींग नं. २१/अ, खाली क्र. १०६८, मच्छिमार नगर, माहिम, मुंबई येथील वडिलोपार्जित ट्रान्झीट कॅम्पचे मिळालेले घरभाडे. | ९,४३,५०० |
| ३ | गाळा क्र. ८, ढोलकीवाला चाळ, माझगाव, मुंबई येथील वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळालेल्या व्यावसायिक भाडोत्री दुकानाचे भाडे. | ८,३४,५०० |
| ४ | मुळ गाव मु. पो. पापाची तिकटी, डि वॉर्ड, ता. जि. कोल्हापूर येथील | ७,६९,८०० |

समक्ष
Dt. 22.10.26
ACP Sandeep Gaikwad
ACB Mumbai Unit.



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळालेल्या व्यावसायिक भाडोत्री दुकानाचे भाडे. | |
| ५ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटचे घरभाडे. | ५३,५७,७२६ |
| ६ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता घेतलेले गृहकर्ज | ७,००,००० |
| ७ | आयकर परतावा | १,१५,२२० |
| ८ | एलआयसीमध्ये केलेल्या गुंतवणूकीतुन मिळालेला परतावा | ९६,८१२ |
| ९ | कॅनरा बॅक खात्यांवर आवर्ती ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | २,९४,३६८ |
| १० | स्टेट बॅक ऑफ इंडिया खात्यावर आवर्ती ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | ५८,०८४ |
| ११ | युनियन बॅक ऑफ इंडिया खात्यावर आवर्ती ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | २,७३,५४३ |
| १२ | युनियन बॅक ऑफ इंडिया खात्यावर मुदत ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | २,५९,७०४ |
| १३ | कॅनेरा बॅक खात्यावर मुदत ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | ९०,१६५ |
| १४ | विविध बॅक खात्याव्दारे मिळालेले व्याज. | २,४९,२६३ |
| १५ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटचे घरभाडयापोटी मिळालेली अनामत रक्कम | १,२५,००० |
| | एकुण रु. | २,०५,०६,८८७ |

**२) आलोसे सतिश पोवार यांच्या खर्चाचा तपशिल रूपये:— १,२६,५५,६६७ /—**

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | रुपये |
|---|---|---|
| १ | ना शाबित खर्च | ३९,७३,५८७ |
| २ | बिल्डींग नं. २१/अ, खाली क्र. १०६८, मच्छिमार नगर, माहिम, मुंबई येथील वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळालेल्या ट्राझीट कॅम्पचे म्हाडा कार्यालयास अदा केलेले भाडे. | ८४,२०० |
| ३ | गाळा क्र. ४, ढोलकीवाला चाळ, माझगाव, मुंबई येथील वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळालेल्या व्यापारी गाळयाचे बृमनपा कार्यालयास शुल्क, थकीत भाडे व इतर खर्च अदा | ५८,६३७ |
| ४ | मुळ गाव मु. पो. पापाची तिकटी, डि वॉर्ड, ता. जि. कोल्हापूर येथील वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळालेल्या व्यापारी गाळयाचे कोल्हापूर महानगर पालिकेस अदा केलेले भाडे | १७,१७० |
| ५ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता कॅनरा बॅकेकडून घेतलेल्या गृहकर्जाची परतफेड | १२,८१,१७२ |
| ६ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता अदा केलेला देखभाल खर्च | ६,०८,८९० |
| ७ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता भरण्यात आलेले नोंदणी व मुद्रांक शुल्क | ८५,७८५ |
| ८ | फ्लॅट क्र. ४/८, नवजीवन सोसायटी, मोरी रोड, माहिम पश्चिम, मुंबई या फ्लॅटकरीता अदा केलेला देखभाल खर्च | ४,१५,८७६ |
| ९ | फ्लॅट क्र. ४/८, नवजीवन सोसायटी, मोरी रोड, माहिम पश्चिम, मुंबई या फ्लॅटकरीता भरण्यात आलेले नोंदणी व मुद्रांक शुल्क | १,४१,९४० |
| १० | बॅक खात्यातून खर्च झालेली रक्कम | ३६,७४,४३९ |
| ११ | पत्नी सौ. कविता पोवार यांना आलोसे यांचे बॅक खात्यातून दिलेली रक्कम | १२,६५,००० |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १२ | मुलांच्या शिक्षणाचा खर्च | १,२७,९७६ |
| १३ | परिक्षण कालावधीत वेतना व्यतिरिक्तच्या उत्पन्नावर भरलेला आयकर | ६,२५,५७६ |
| १४ | मोबाईल हॅन्डसेट व रिचार्जचा खर्च | १,६३,९८६ |
| १५ | टाटा एआईजी हेल्थ मेडीक्लेम इन्शुरन्सकरीता खर्च झालेली रक्कम | ७८,९३३ |
| १६ | कालरा शुक्ला क्लासेस ट्युशन फी | ५२,५०० |
| | एकुण | १,२६,५५,६६७ |

**३) आलोसे सतिश पोवार यांच्या मालमत्तेचा तपशिल रूपये १,९६,३२,९३०/—**

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | बिल्डींग नं. २१/अ, खाली क्र. १०६८, मच्छिमार नगर, माहिम, मुंबई — ४०० ०१६. (ट्रान्झिस्ट कॅम्प—वडिलोपार्जित मालमत्ता) | ०० |
| २ | गाळा क्र. ४, ढोलकीवाला चाळ, माझगाव, मुंबई येथील वारसा हक्काने प्राप्त व्यावसायिक भाडोत्री दुकान गाळा (वडिलोपार्जित मालमत्ता) | ०० |
| ३ | मुळ गाव मु. पो. पापाची तिकटी, डि वॉर्ड, ता. जि. कोल्हापूर येथील वारसा हक्काने प्राप्त व्यवसायीक भाडोत्री गाळा (वडिलोपार्जित मालमत्ता) | ०० |
| ४ | फ्लॅट क्र. ४/८, नवजीवन सोसायटी, मोरी रोड, माहिम पश्चिम, मुंबई. | १९,६६,००० |
| ५ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई | ७,००,००० |
| ६ | एलआयसी विमा पॉलीसीमधील गुंतवणूक | १७,४५,४२३ |
| ७ | युनियन बॅंक, माहिम शाखा येथील मुदतठेवी गुंतवणूक | २८,००,००० |
| ८ | किसान विकास पत्रात केलेली गुंतवणुक | २,८६,००० |
| ९ | परिक्षण कालावधी अखेर बॅंक खात्यातील शिल्लक रक्कम | ४,१५,७३७ |
| १० | घरझडती पंचनाम्यामध्ये मिळून आलेली रोख रक्कम व मालमत्तांचे मुल्य | १,१७,१९,७७० |
| | एकूण | १,९६,३२,९३० |

उघड चौकशामध्ये केलेल्या सविस्तर चौकशीमध्ये गैरअर्जदार यांच्या पत्नी नामे कविता सतीश पोवार यांचा_एकुण उत्पन्न, एकुण खर्च बावत सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**१) सौ. कविता सतिश पोवार यांच्या उत्पन्नाचा तपशिल एकूण रूपये १,१६,०२,०९६/—**

| अ.क्र. | उत्पन्नाचा तपशील | उत्पन्न रुपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटचे घरभाडे. | ५३,५७,७२६ |
| २ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता घेतलेले गृहकर्ज | ७,००,००० |
| ३ | फ्लॅट क्र. ३०३, नंदनवन बिल्डिंग, गावठाण पोस्ट कार्यालयासमोर, चेंबूर, मुंबई या फ्लॅटचे घरभाडे. | २५,५९,००० |
| ४ | आलोसे सतिश पोवार यांनी बॅंक खात्यामार्फत दिलेली रक्कम | १२,६५,००० |
| ५ | आयकर परतावा | ६६,५९० |
| ६ | कॅनरा बॅंक खात्यांवर आवर्ती ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | १७,३५४ |
| ७ | विविध बॅंक खात्याव्दारे मिळालेले व्याज. | १,६१,८४० |
| ८ | अभिजित वायकर ( भावोजी) यांचेकडुन घेतलेले कर्ज. | ४,५०,००० |

समक्ष
[signature]
Dt. 22.10.26
ACP Sandeep Gaikwad
ACB Mumbai Unit

[signature]

| | | |
|---|---|---|
| ९ | कॅनेरा बॅक खात्यावर मुदत ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | १४,४२५ |
| १० | स्टेट बॅक ऑफ इंडिया खात्यावर आवर्ती ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | ५८,०८५ |
| ११ | युनियन बॅक ऑफ इंडिया खात्यावर मुदत ठेव योजनेवर मिळालेला लाभांश | १,१६,०७६ |
| १२ | बिल्डआर्ट बांधकाम कंपनीकडुन मिळालेले भांडवल व नफा | ४,३१,००० |
| १३ | फ्लॅट क्र. ३०३, नंदनवन बिल्डिंग, गावठाण पोस्ट कार्यालयासमोर, चेंबूर, मुंबई या फ्लॅटचे घरभाडयापोटी मिळालेली अनामत रक्कम | २,००,००० |
| १४ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटचे घरभाडयापोटी मिळालेली अनामत रक्कम | १,२५,००० |
| | एकूण | १,१६,०२,०९६ |

**२) सौ. कविता सतिश पोवार यांच्या खर्चाचा तपशिल एकूण रूपये ६३,०४,३८१/—**

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | खर्च रुपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता कॅनरा बॅकेकडून घेतलेल्या गृहकर्जाची परतफेड | १२,८१,१७२ |
| २ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता अदा केलेला देखभाल खर्च | ६,०८,८९० |
| ३ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई या फ्लॅटकरीता भरण्यात आलेले नोंदणी व मुद्रांक शुल्क | ८५,७८५ |
| ४ | फ्लॅट क्र. ३०३, नंदनवन बिल्डिंग, गावठाण पोस्ट कार्यालयासमोर, चेंबूर, मुंबई या फ्लॅटकरीता अदा केलेला देखभाल खर्च | ३,६०,२०० |
| ५ | फ्लॅट क्र. ३०३, नंदनवन बिल्डिंग, गावठाण पोस्ट कार्यालयासमोर, चेंबूर, मुंबई या फ्लॅटकरीता भरण्यात आलेले नोंदणी व मुद्रांक शुल्क | १,१९,१०० |
| ६ | फ्लॅट क्र. ४/८, नवजीवन सोसायटी, मोरी रोड, माहिम पश्चिम, मुंबई खरेदीसाठी दिलेली रक्कम | ५,३४,००० |
| ७ | बॅक खात्यातून खर्च झालेली रक्कम | २७,८१,५०४ |
| ८ | परिक्षण कालावधीत भरलेला आयकर | २,१९,८६२ |
| ९ | युनियन बॅक लॉकर शुल्क | ११,२२५ |
| १० | बॅक ऑफ इंडिया बॅक लॉकर शुल्क | ३१,९२९ |
| ११ | मोबाईल सिमकार्ड रिचार्ज खर्च | ६०,९९६ |
| १२ | कालरा शुक्ला क्लासेस टयुशन फी | १,०४,७१८ |
| १३ | दुकान क्र. डी/०३, पर्ल रेसीडन्सी, बाबु जगजिवनराम, नगर, धारावी, मुंबई या दुकानाचे नोंदणी व मुद्रांक शुल्क | १,०५,००० |
| | एकूण | ६३,०४,३८१ |

**३)सौ. कविता सतिश पोवार यांच्या मालमत्तेचा तपशिल एकूण रूपये ६२,९७,९३४/—**

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | फ्लॅट क्र. ९०२, दोस्ती कारनेशन फोर, अॅन्टॉप हिल बस डेपोजवळ, वडाळा पूर्व, मुंबई | १२,३०,४०० |
| २ | फ्लॅट क्र. ३०३, नंदनवन बिल्डींग, गावठाण पोस्ट कार्यालयासमोर, चेंबूर, मुंबई | २२,७५,००० |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ३ | कॅनरा बॅक खात्यावर आवर्ती ठेव योजनेत केलेली गुंतवणुक | ८,०५,००० |
| ४ | घरझडती पंचनाम्यामध्ये मिळून आलेल्या सौ. कविता पोवार यांचे दागीण्यांचे मुल्य | २,२८,३०३ |
| ५ | दुकान क्र. डी/०३, पर्ल रेसीडन्सी, बाबु जगजिवनराम, नगर, धारावी, मुंबई | १५,००,००० |
| ६ | परिक्षण कालावधी अखेर बॅक खात्यातील शिल्लक रक्कम | २,५९,२३१ |
| | एकूण | ६२,९७,९३४ |

**गैअ सतीश पोवार व त्यांची पत्नी कविता सतीश पोवार यांचे उत्पन, खर्च व मालमत्ता याबाबत एकत्रित स्थिती खालीलप्रमाणे निष्पन्न झालेली आहे.**

**सतिश पोवार व कुटुंबियाच्या अपसंपदेची टककेवारी**

| अक्र. | तपशील | सतिश पोवार | कविता पोवार |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ०४/११/२०२२ रोजीची मालमत्ता ( स्टेटमेंट – ब ) | 19632930 | 6297934 |
| २ | दिनांक ०१/०१/२००५ रोजीची मालमत्ता ( स्टेटमेंट – अ ) | 0 | 0 |
| ३ | परिक्षण कालावधी दरम्यान धारण केलेली मालमत्ता ( स्टेटमेंट ब – अ) | 19632930 | 6297934 |
| ४ | परिक्षण कालावधी दरम्यानचा खर्च ( स्टेटमेंट – ड ) | 12655667 | 6304441 |
| ५ | परिक्षण कालावधी दरम्यानची एकूण मालमत्ता व खर्च ( ३ + ४) | 32288597 | 12602375 |
| ६ | परिक्षण कालावधी दरम्यानचे एकूण उत्पन्न (स्टेटमेंट–क) | 20506887 | 11602096 |
| ७ | एकूण अपसंपदा (५–६) | 11781710 | 1000279 |
| ८ | अपसंपदेची टककेवारी (अपससंपदा / एकूण उत्पन्न) *१०० | 57.45 % | 8.62 % |

आलोसे सतिश विश्वनाथ पोवार, पदनिर्देशित अधिकारी (कार्यकरी अभियंता), सहा. आयुक्त के/पुर्व विभाग यांचे कार्यालय, बृहन्मुबई महानगरपालिका गुंदवली, अंधेरी(पु.), मुंबई व त्यांची पत्नी सौ. कविता सतिश पोवार यांच्या मालमत्तेबाबत उघड चौकशी क्रमांक ३१/२०२२ अन्वये सखोल चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान आलोसे सतिश पोवार यांचे एकूण उत्पन्न रु. २,०५,०६,८८७/– एवढे असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आलोसे सतिश पोवार यांचा एकूण खर्च रु. १,२६,५५,६६७/– एवढा झाला असून त्यांची एकूण मालमत्ता ही एकूण रु. १,९६,३२,९३०/– एवढी असल्याचे आढळून आले आहे. आलोसे सतिश पोवार यांची अपसंपदा ही त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा रु. १,१७,८१,७१०/– (५७.४५ टक्के) जास्त असल्याचे दिसून येत आहे.

तसेच आलोसे सतिश पोवार यांची पत्नी सौ. कविता पोवार यांचे एकूण उत्पन्न रु. १,१६,०२,०९६/–, एकूण खर्च रु. ६३,०४,४४१/– व एकूण मालमत्ता रु. ६२,९७,९३४/– एवढी असल्याचे आढळून आले आहे. सौ. कविता पोवार यांची अपसंपदा ही त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा रु. १०,००,२७९/– (०८.६२ टक्के) जास्त नसल्याचे दिसून येत आहे. सौ. कविता पोवार यांना घरभाडयापासुन, विविध ठेव योजनेवरील लाभांश तसेच अनामत रक्कम इत्यादी मधुन उत्पन्न मिळालेले आहे. त्याबाबत त्यांनी आयकर भरलेला आहे. त्यांचे उत्पन्न, खर्च तसेच मालमत्ता यांचा ताळमेळ घातला तो १० टक्केच्या आतमध्ये असल्याने त्यांची अपसंपदा दिसुन येत नाही.

समक्ष
Dt. 22.10.26
ACP. Sandeep Gaikwad
ACB Mumbai Unit



Scanned with OKEN Scanner

तरी आलोसे सतिश विश्वनाथ पोवार, पदनिर्देशित अधिकारी (कार्यकरी अभियंता), सहा. आयुक्त के/पुर्व विभाग यांचे कार्यालय, बृहन्मुबई महानगरपालिका गुंदवली, अंधेरी (पु.), मुंबई यांनी परिक्षण कालावधीत त्यांच्या एकूण ज्ञात उत्पन्ना पेक्षा जास्त म्हणजेच रु. १,१७,८१,७१०/– (५७.४५ टक्के) एवढी अपसंपदा धारण केल्याबाबत निष्पन्न झाले आहे. गैरअर्जदार सतिश विश्वनाथ पोवार पदनिर्देशित अधिकारी (कार्यकरी अभियंता) यांनी कायदेशीर आणि ज्ञात उत्पनापेक्षा भ्रष्ट व गैरमार्गाने अधिक अपसंपदा संपादीत केली आहे म्हणुन माझी सतिश विश्वनाथ पोवार यांचे विरोधात कलम १३(१)(ब) सह १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ या कायदयान्वये सरकारतर्फे तक्रार आहे.

माझा जबाब मी वाचून पाहिला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

Dt. 22.10.26
ACP Sandeep Gaikwad
ACB Mumbai Unit.

( दिनेश मदाणे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई



Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ....... ACB उघड चौकशी. क्र. 31/2022 चे चौकशीवरून दाखल
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
.......

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....... —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ....... —
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
यातील नमूद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवक सतिश विश्वनाथ पेवार यांनी लोकसेवक या नात्याने कर्तव्य पार पाडत असताना दि. 05.01.05 ते दि. 04.11.22 मधल्या कालावधीमध्ये मुख्य व गैरमार्गाने कायदेशीर व ज्ञात मिळकतीपेक्षा अधिक किंमतीची म्हणजे 1,17,81,710/- (57.45) टक्के किंमतीची अपसंपदा संपादित केली म्हणून गुन्हा सीआरडी दाखल करण्यात आला आहे.

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : .......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
.......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ....... जिल्हा ....... राज्य .......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......

(3) Transferred to P. S. .......
District ....... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली/फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. 22.10.26
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ....... संदीप सुखराम गायकवाड
पदनाम Rank ....... सहायक पोलीस आयुक्त
तपासिक अ. चा कोड क्र. ....... ला.प्र.वि. मुंबई घटक.
Posting
Code No. of I. O. .......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख .......
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner